# पोलीस अधीक्षक कार्यालय,नाशिक ग्रामीण

पोलीस मुख्यालय, आडगाव, नाशिक – पिन 422003

दुरध्वनी नंबर 0253-2309700

E.Mail- sp.nashik.r@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

## प्रेस नोट

दिनांक : २८/१२/२०२४

---

नाशिक जिल्हयात द्राक्ष उत्पादक शेतकरी यांची व्यापारी यांच्याकडुन झालेल्या फसवणुकीबाबत दिनांक २५/१२/२०२४ रोजी विशेष पोलीस महानिरीक्षक, नाशिक परिक्षेत्र कार्यालय येथे माननीय श्री.माणिकराव कोकाटे कृषी मंत्री, महाराष्ट्र राज्य मुंबई व श्री.दत्तात्रय कराळे, विशेष पोलीस महानिरीक्षक नाशिक परिक्षेत्र, नाशिक यांचे मार्गदर्शनाखाली बैठक घेण्यात आली. सदर बैठकीस जिल्हा पोलीस अधीक्षक श्री. विक्रम देशमाने, अपर पोलीस अधीक्षक नाशिक ग्रामीण श्री. आदित्य मिरखेलकर, उपविभागीय पोलीस अधिकारी श्री किरणकुमार सुर्यवंशी, पोलीस निरीक्षक आर्थिक गुन्हे शाखा, श्री रविंद्र मगर असे हजर होते.

सदर बैठकीस नाशिक जिल्हयातील द्राक्ष उत्पादक शेतकरी उपस्थित होते, त्यात गेल्या ७ ते ८ वर्षापासुन ज्या शेतक-यांची फसवणुक झालेली आहे, अशा सर्व शेतक-यांनी त्यांच्या व्यथा यावेळी मांडल्या. यावेळी मा. पोलीस अधीक्षक श्री. विक्रम देशमाने यांनी त्यांचे समस्यांवर पोलीसांमार्फत कसे नियंत्रण करता येईल याबाबत मार्गदर्शन केले, तसेच यापुर्वी ज्या शेतक-यांची अशा प्रकारे फसवणुक झालेली आहे त्याबाबत नवीन गुन्हे दाखल करुन त्यामध्ये फसवणुक करणारे व्यापा-यांबरोबर त्यांना मदत करणारे स्थानिक लोक असतील त्यात पायलेट, सर्व्हीस प्रोव्हायडर, ट्रान्सपोर्ट किंवा गि-हाईक पाहुन देणारे इसम अशा लोकांना सुध्दा गुन्हयांमध्ये आरोपी बनवणार असुन कडक कारवाई करण्यात येणार आहे. तसेच आता द्राक्ष हंगाम सुरु झाला असुन शेतकरी यांनी त्यांचा द्राक्षमाल देतांना कुठली काळजी घ्यावी व कोणत्या उपाययोजना बाळगाव्यात याबाबत दक्ष राहणे करीता सुचना दिल्या आहेत. तसेच अनोळखी व्यापारास माल देउ नये, जो व्यापारी शेतक-यांकडे माल घ्यायला येईल त्याबाबत शेतकरी यांनी स्थानिक पोलीस स्टेशनला माहिती दिल्यास त्या व्यापा-याचे पोलीस स्टेशन मार्फत तात्काळ व्हेरिफिकेशन करुन दिले जाईल, जेणेकरुन सादर व्यापा-यावर अशा प्रकारचे गुन्हे दाखल आहेत काय याची पडताळणी होईल. तसेच असे प्रकार होउ नये यासाठी शेतक-यांनी बळीराजा हेल्पलाईनचा वापर करावा, आपणास पोलीस दलातर्फे त्वरीत मदत उपलब्ध करून देण्यात येईल असे यावेळी मा.पोलीस अधीक्षक यांनी कळविले. तसेच शेतकरी फसवणुकीबाबत पणन विभाग व कृषी विभाग यांना पत्रव्यवहार करण्यात आला आहे, त्यांचे विभागामार्फत त्यांनीही उपाययोजना कराव्यात बाबत कळविले आहे. शेतक-यांना आणखीन काही समस्या असल्यास पोलीसांशी संपर्क साधावा, तसेच शेतकरी फसवणुकीबाबत दर ३ आठवडयाने आढावा बैठक घेण्यात येईल असे यावेळी पोलीस अधीक्षक श्री. विक्रम देशमाने यांनी कळविले आहे.